महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१

Email id :- mscepune@gmail.com फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७


**अति महत्वाचे**

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा-४(२५)/२०२१/2545

दिनांक :- 06/०९/२०२१.

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा**

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-२०२१**
**लघुलेखन निकाल वाटपाबाबत.**

उपरोक्त विषयान्वये शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-२०२१ मध्ये दि.०२/०२/२०२१ ते दि.०६/०२/२०२१ या कालावधीत महाराष्ट्र व गोवा राज्यात घेण्यात आलेली आहे.

सदर परीक्षेचा निकाल दि.२४/०६/२०२१ रोजी परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन जाहिर करण्यात आलेला आहे.

सदर परीक्षेच्या निकालाची सिलबंद पाकिटे संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयास दि.२३/०८/२०२१ पासून पाठविण्यात आलेली आहेत.

सदरील निकाल पाकिटातील लघुलेखन विषयाच्या सर्व प्रमाणपत्राची काही तांत्रिक कारणांमुळे छपाई सदोष झालेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपणांस प्राप्त लघुलेखन विषयाची सर्व प्रमाणपत्रे या कार्यालयास परत पाठविण्यात यावी

आपणाकडून विद्यार्थ्यांना लघुलेखन विषयाची प्रमाणपत्रे वाटप केले असतील तर ती विद्यार्थ्यांकडून परत घेण्यात यावीत व नंतरच दुरूस्त प्रमाणपत्र देणेत यावे जेणेकरून विद्यार्थ्यांकडे एका विषयाची दोन प्रमाणपत्रे राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

सदरील उपरोक्त लघुलेखन विषयाची सर्व मूळ प्रमाणपत्रे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) या कार्यालयाकडे जमा करावी. सर्व प्रमाणपत्रे एकत्रित या कार्यालयस प्राप्त झालेनंतरच मूळ प्रमाणपत्रांची पुनर्छपाई करून संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे स्पीड पोस्टाव्दारे पाठविण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

(तुकाराम सुपे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-१**

**प्रत माहितीस्तव :-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व

२. प्रत देवून कळविण्यात येते की, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उ/द/प) यांनी लघुलेखन विषयाच्या मूळ प्रमाणपत्रांची पाकिटे संस्थांकडून प्राप्त करून घ्यावीत व नंतर एकत्रित परीक्षा परिषदेकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.